स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

संशोधन विषय

‘‘नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास.’’

संशोधक

शोभा विठ्ठल सरकुंडे

मराठी विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजेश धनजकर

मराठी विभाग

श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,गंगाखेड

ता. गंगाखेड जि.परभणी.

‘‘नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास’’

१. प्रास्ताविक :

नांदेड जिल्हयातील आंध लोक हे इतर जिल्हयातील आदिवासी जमातीच्या तुलनेत मागास आहेत. आंध जमातीला प्राचीन परंपरा असल्याचे दिसते. हे त्याच्या लोकसाहित्यावरुन व त्यांच्या प्राचीन प्रथा व परंपरावरुन दिसून येते. आंधाचा मूळ व्यवसाय शेती व शेतमजूरी आहे. त्याला पूरक व्यवसाय कुक्कूटपालन, मासे पकडणे, शेळया पाळणे, मोळया विकणे हे व्यवसाय करतात. नांदेड जिल्हयातील आंध जमातीच्या लोकजीवनाचे विविध पैलू त्यांच्या लोकसाहित्यावरुन लक्षात येतात. शिवाय आंधाचे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवन कशा पध्दतीचे होते व आहे हे आंध समाजात मौखिक परंपरेने प्रचलित असलेली लोकगीते, लोककथा, उखाणे, म्हणी व वाक्प्रचार या लोकवाङ्मयावरुन लक्षात येते. लोकसमजूती, रुढी, प्रथा, लोकविंधी, सणोत्सव, अंधश्रद्धा, नवससायास असणे, देवीदेवता, आचार विचार व लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे या सर्व घटकाचा अभ्यास करावा लागेल. मी क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा अवलंब करणार आहे. तसेच आंधाच्या अभ्यासासाठी ‘प्रश्नावली’ सारख्या पद्धतीचाही मला वापर करावा लागणार आहे. त्या दृष्टीने संशोधन अभ्यासामध्ये नांदेड जिल्हयातील डोंगरकपारीत, रानमाळावर, दऱ्याखोऱ्यात, घनदाट जंगलात, उजाड माळावर व काही भागातील सपाट प्रदेशात फिरुन आंध स्त्री—पुरुषाजवळील लोकसाहित्याचे संकलन करुन त्यांचा सर्वांगिण व अर्थपूर्ण अभ्यास करावा लागेल.

२. विषय निवडण्यामागील भूमिका :

माझी नाळ ही आदिवासी समाजाशी जोडली गेली आहे. माझ्या प्रत्येक दिवसाची पहाटही आदिवासी समाजाशी जोडलेली आहे. एकप्रकारे माझीही जन्म भूमी व कर्मभूमी आहे. बिरसा मुंडा याची जयंती आदिवासी समाजामध्ये खेडयापाडयात व जिल्हा स्तरावर देखील मोठया उत्साहात साजरी होते.

नांदेड जिल्हयातील आंध लोक धार्मिक व श्रद्धाळू वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्या जीवनात अनेक देवीदेवतांना अतिशय महत्व आहे. आपल्या जीवनाचे बरे वाईट याच देवता करतात अशी त्यांची धारणा असते. म्हणून ते त्यांची मनोभावे पूजा करुन त्याना आपलेसे करतात. वेळप्रसंगी त्यांच्या नावे नवस बोलतात व नवसाची पुर्तता झाल्यास तत्काळ नवसही फेडतात. आंधाच्या धार्मिक जीवनात हिंदुच्या देवीदेवतांना ही तेवढेच महत्व आहे. कारण हिंदुच्या देवता आता आंधाच्या देवता झालया आहे. आंध जमातीचे सांस्कृतिक जीवन त्यांच्या लोककलाविष्कारातून अभिव्यक्त होताना दिसते. या विधी, खेळ क्रीडा, नाटयप्रयोग, सणउत्सव, जत्रा–यात्रा करमणूकीची साधने या लोककलावर प्रकाश टाकावा लागेल. आंधाचे लोकसाहित्य संकलनात्मक नाही. त्याला लिखित रुप प्राप्त करुन देणे.

नांदेड जिल्हयातील आदिवासी आंधाचे लोकसाहित्य हे मौखिक परंपरेनेच सध्या अस्तित्वात असल्यामुळे त्याला लिखित स्वरुप प्राप्त करुन देण्यासाठी मी 'नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास' निवडण्याचे कारण की,

१. अंध हा आदिम समाज
२. या जमातीच्या लोकसाहित्याचे संकलन व संशोधन नाही
३. अकलनात्मक काम आहे
४. लोकसाहित्य काळाच्या ओघात गडप होऊ नये म्हणून

आदिवासी आंध जमातीचे लोकसाहित्यावर आतापर्यंत काम झाले नाही. त्यामुळे मी हा विषय निवडला आहे.

३. संशोधन विषयाचे महत्व :

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधकाने आपले संशोधन समाजाला नवी दिशा देणारे असते. चांगले संशोधन करणे आणि त्याची परंपरा तयार करणे ही जबाबदारी आपल्या देशातील सर्व प्रकारच्या संशोधकांची आहे.

मराठी साहित्यामध्ये आदिकाळापासून लोकसाहित्य अस्तित्वात आहे. आदिवासी आंधाचे लोकसाहित्य हे लिखित स्वरुपात कमी प्रमाणात असून ते मौखिक स्वरुपातच जास्त प्रमाणात पाहायला मिळते. १९६० नंतर आदिवासी व आदिवासी इतर लेखकांनी आदिवासी लोकसाहित्यावर लेखन केले असे दिसते. आदिवासी आंध समाजसेविकांनी केलेले कार्य व आदिवासी आंध क्रांतीविरांनी केलेल्या पराक्रमी कार्याचा गौरवशाली इतिहास, आदिवासीच्या लोकसाहित्यात दिसतो. याची माहिती समाजाला व्हावी या उद्‌देशानी संशोधन विषयाचे महत्व आहे. त्याचप्रमाणे आंधाच्या परंपरा, लोकरुढी, संस्कृतिचे दर्शन समाजाला होईल. या लोकसाहित्याचा समाजाला परिचय व्हावा म्हणून त्याला लिखित स्वरुप देणे आवश्यक आहे. त्यामुळे समाजाला आंधाच्या लोकसाहित्याचा परिचय होईल. आंधावर झालेला अन्याय, अत्याचार याचे दर्शन व्हावे म्हणून या दृष्टीने संशोधन विषयाचे महत्व आहे.

४. संशोधन विषयाचे वेगळेपण :

‘‘ नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक विषयाचे वेगळेपण आहे. आदिवासी आंध लोकसाहित्यावर, संस्कृतीवर आतापर्यन्त संकलन व संशोधन झाले नाही म्हणून हा विषय मी निवडला आहे. हा विषय निवडण्याचे कारण की यामध्ये सर्वेक्षण करुन माहिती संकलन करावे लागते. यामध्ये सर्वेक्षण करावे लागते. त्यामुळे मी हा विषय निवडला आहे.

५. संशोधन विषयाच्या मर्यादा :

‘‘नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास’’या विषयाची माहिती संकलित करीत असताना मला पाडयावर, डोंगरदऱ्यात, वाडया, वस्त्यावर जावे लागले. त्यांच्या सोयीनुसार गीत, कथा ऐकणे, लोकांची मनधरणी करणे, ग्रंथ मिळवणे, आंध लोकांच्या सोयीने घेणे, तसेच आंध लोक कामासाठी शेतावर गेलेले असतात. कोणी इतरांच्या शेतावर मजूरीने काम करण्यासाठी गेलेले असतात. तेव्हा त्यांच्याशी संपर्क साधून माहिती संकलन करण्यात अडचणी

येऊ शकतात. एकाच भेटीमध्ये माहिती संकलित होईल असे नाही त्यांच्या कामाच्या वेळाव्यतिरिक्त वेळात जाऊन माहितीचे संकलन करताना हया मर्यादा पडतील.

६. गृहितके :

आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी काही गृहितके डोळयासमोर असणे अत्यंत आवश्यक असते. कारण गृहितकृत्यामुळेच संशोधनाला एक प्रकारची दिशा प्राप्त होते. व संशोधनकर्ता आपले कार्य सुरु ठेवतो. संशोधनकर्त्याला पुढील प्रश्न व अडचणीचे संभाव्य उत्तर हे गृहितकांमधून मिळू शकते.

❖ आंध ही एक मराठवाड्यातील आदिवासी जमात आहे.
❖ आंध जमातीत सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणा अजूनही आढळून येतो.
❖ आंध जमातीच्या लोकसाहित्याला मौखिक परंपरा आहे.
❖ आंध जमातीवर अनेक रुढी, प्रथा आणि परंपरांचा पगडा असल्याचे दिसते.
❖ आंधाच्या लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा बोध होतो.
❖ आदिवासी आंधाच्या लोककलांना मौखिक परंपरा आहे.
❖ आंध जमातीत ऊखाणे, म्हणी व वाकप्रचार आदीना मौखिक परंपरा आहे.
❖ आंधाच्या लोकगीतांतून त्यांचे जीवन आविष्कृत होताना दिसते.
❖ आंधाच्या लोकवाङ्मयात मंत्रात्मकता दृष्टीस पडते.

७. संशोधन अध्ययनाचे क्षेत्र :

''नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास'' या विषयाची माहिती संकलित करतांना आंध जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना नांदेड जिल्हयातील काही गावे त्यातील आंध समाज या आदिवासी आंधाचे वास्तव्य आहे तेथे जाऊन माहिती संकलित करावी लागेल. नांदेड जिल्हयातील काही तालुके, तालुक्यातील काही गावे, आदिवासी आंधाच्या वाडया, वस्त्या, डोंगरदऱ्यात, दऱ्याखोऱ्यात जावे लागेल या विषयावर संशोधन करत असतांना या क्षेत्राची निवड करावी लागेल.

८. संशोधन अध्ययनाची उद्दिष्टये :

१. महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा आढावा घेणे.

२. नांदेड जिल्हयातील आदिवासी आंधाच्या सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्हयातील आंध जमातीची लोकगीते अभ्यासणे.

४. नांदेड जिल्हयातील आंध जमातीमधील लोककथाचा आढावा घेणे.

५. नांदेड जिल्हयातील आंधाचे पारंपारिक लोकनाटय त्याची नोंद करणे.

६. आदिवासी आंधाच्या लोकसाहित्यातील लोकजीवनावर प्रकाश टाकणे.

७. उखाणे, म्हणी व वाकप्रचार यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

८. संशोधन विषयाच्या अध्ययनाची मांडणी.

प्रकरण १ ले

महाराष्ट्रातील आदिवासी समाज

महाराष्ट्रातील आदिवासी समाज हा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात राहतो. आदिवासी समाजाचे वास्तव्य महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात, जंगलात, आदिवासी पाडा, वाडया वस्त्यावर असल्याचे पाहायला मिळते. गौंड, भिल्ल, शेती हा आादिवासी आंधाचा मुख्य व्यवसाय आहे. त्याला पूरक व्यवसाय कुक्कूट पालन, शेळी पालन, मासे पकडणे, मोळया विकणे, टेर्भुणीची पाने जमविणे, डिंक काढणे, बिब्याची गोडंबी फोडणे, चारोळी जमवणे यासारखे पूरक व्यवसाय हे लोक करतांना दिसून येतात. त्यांचे कौटुंबिक जीवन हे अगदी साधे असते. त्यांचे आर्थिक सांस्कृतिक, धार्मिक जीवन हे इतर समाजापेक्षा खूप भिन्न पाहायला मिळते. आदिवासी समाजाला समाजव्यवस्थेत फारसे स्थान नव्हते. त्यांना दुय्यम अशा प्रकारची वागणूक दिली जात असे. आदिवासी जमात ही समूहाने राहणारी जमात आहे. आणि एकजिनसीपणा हे जमातीचे एक प्रमुख लक्षण आहे. कुठलेही सामाजिक कार्ये पार पाडण्यासाठी हे लोक लवकर जमा होतात. व एकोप्याने ते कार्ये पार पाडतात. एवढा एकोपा त्यांच्यात दिसून येतो. समान संस्कृती, समान धर्माचरण, समान सामाजिक नियमन व एकाच

प्रकारच्या भौगोलिक प्रदेशामुळे आदिवासी जमातीच्या संपूर्ण आचार विचारात एकजिनसीपणा दिसतो. सुरुवातीपासून समूहाने राहणाऱ्या या जमातीने आपली पारंपारिक एकजूट कायम ठेवली आहे. आदिवासी जमातीचे लोक कामानिमित्त इतर जिल्हयात जातात आणि त्यातील काही लोक त्याच ठिकाणी स्थायिक होताना दिसतात.

आदिवासी समाजाचे सणोत्सव मनोरंजनाची साधने, स्त्री—पुरुष यांच्या गीतातील वेगळेपणा याचा अभ्यास करणे, त्याचे दैनंदिन जीवन आर्थिक व्यवहार याचा अभ्यास करणे. आदिवासीचे धार्मिक विधी, सण, उत्सव यात्रा,जत्रा व समारंभ इ. प्रसंगी हे लोक एकात्मक भावनेने सर्व कामे पार पाडतात. याचा अभ्यास करणे. आदिवासी हे प्रामाणिकपणा, खरे बोलणे, इमानदारीने कोणतेही काम करणे व नको त्या गोष्टीचा आव न आणणे इत्यादी गुण या लोकांमध्ये असतात, यावर प्रकाश टाकणे. आदिवासी समाज मागास असल्यामुळे त्यांचे घरदार भांडी—कुंडी, राहणीमान, याचा अभ्यास करणे.

प्रकरण २ रे

नांदेड जिल्हयातील आदिवासी आंधाची सामाजिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीचे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवन यांचा चिकित्सक अभ्यास करणे. या जमातीचे प्राचीन अवशेष महाराष्ट्रातील लेणी व शिलालेखामध्ये दिसून येतात. तसेच नांदेड जिल्हयातील अर्धापूर, हातगाव, किनवट आणि तसेच मुखेडच्या डोंगररांगामध्ये आंधांचे वास्तव्य दिसून येते. प्राचीन वाङ्मयात देखील आंधाचा उल्लेख अंध्र, अंध्रक, आंध्रक, आंधवृष्णी, आंध्रभृत्य, आंध्रभोज व आंध्रजातीय अशा विविध नावानी कसे येतात यावर प्रकाश टाकावा लागेल. आंधाचे वास्तव्य गावापासून दूर डोंगरात व दऱ्याखोऱ्यात असल्याचे आजही दिसते. नांदेड जिल्हयातील आंध जमातीचे समाज व्यवस्थेतील स्थान, सामाजिक दर्जा, आदिवासी आंधामध्ये प्रचलित असलेली अंधश्रध्दा, त्याच्या जीवनातील वादविवाद, कामाचे स्वरुप आंधाच्या घरातील

भांडी–कुंडी त्यांचे अलंकार स्त्रियांच्या अंगावरील गोंदणे, त्यांचे पूरक व्यवसाय, मनोरंजनाची साधने इ. चा अभ्यास करावा लागेल.

प्रकरण ३ रे

नांदेड जिल्हयातील आंध जमातीची लोकगीते

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्हयातील आंध जमातीत रुढ असलेली लोकगीते परंपरेने मौखिक स्वरुपात असलेले लोकसाहित्य यांचा अभ्यास करणे. लोकगीतातून आंधाच्या लोकजीवनाचे विविध पैलू पाहावे. लोकगीतांची निर्मिती त्यामध्ये स्त्रियांची लोकगीते, पुरुषाची लोकगीते, लहान मुलांची खेळगीते, गाणी यांचा पण अभ्यास करावा लागेल.

आंध स्त्रीच्या लोकगीतांचा खूप मोठा वाटा आहे हे लक्षात घ्यावे लागेल. जसे ओवीगीते यात आंधाच्या ग्रामदेवता व हिंदूच्या देवीदेवता त्यांनी ओवीत कसे गुफून त्यांच्या विषयीचा श्रद्धाभाव कशाप्रकारे व्यक्त करतात. हयावर प्रकाश टाकणे महादेव, राम, श्रीकृष्ण, विठ्ठल, दत्तात्रय, खंडोबा, म्हसोबा, दावल मलिक, वेताळबवा, रेणुकादेवी, मरीमाय, सटवाई, आसरा, कानोबा यासारख्या देवीदेवतांना आंध स्त्रीने, ओवी गीतांतून लौकिक जगात आणले आणि ही किमया अशिक्षित समजल्या जाणाऱ्या स्त्रीने स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन कशाप्रकारे आहे याचा आढावा घेणे.

आंध समाजातील स्त्रीपुरुषांचा विधी आचरणाकडे कसा अधिक कल असतो. विधीचे आचरण केले नाही तर जीवनात कसे संकट ओढवतात. या मानसिकतेचा अभ्यास करणे. आंध स्त्रीयांप्रमाणे पुरुषांमध्येदेखील काही लोकगीते प्रचलित आहेत. याचा आढावा घेणे. विविधतेने नटलेल्या लोकगीतांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावा लागेल.

प्रकरण ४ थे

नांदेड जिल्हयातील आंध जमातीमधील लोककथा

नांदेड जिल्हयातील आंध जमातीच्या लोकांमध्ये कथा किंवा कहाणी सांगण्याची परंपरा फार प्राचीन आहे. या कथेचे प्रचलन मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे होतांना दिसते. कथा सांगणे व ऐकणे आंध लोकांना विशेष आवडते. त्यातून त्यांचे मनोरंजन होते. मनावरचा ताणही काही काळासाठी कमी होतो. आंधाच्या कथेत देवीदेवता, मानव, पशू—पक्षी व प्राणी यांचा मुक्त संचार असतो. याचा आढावा घेणे कथामध्ये पशु—पक्षी, देव—दानव, राजा, नायक, नायिका, खलनायक व खलनायिका ही पात्रे कथेत असतात. पात्राची वेशभूषा, केशभूषा, अलंकार, इ. चा आढावा घेणे.

आंधाच्या लोककथामध्ये परंपरा, मौखिकता, लोकरंजन या उद्देशाने सांगितल्या जातात. आंधाच्या कथेचे वाङ्मयीन सौंदर्य कथानिवेदक, कथानक, कथांबीज, कथेच्या वर्णनातील सुसंगती व श्रोतावर्ग हया घटकाचा आढावा घ्यावा लागेल. आंध जमातीत सांगितल्या जाणाऱ्या लोककथा त्यांच्या लोकजीवनाशी अतूट नाते कशाप्रकारे जोडून आहे. याचा आढावा घ्यावा लागेल. लोककथातून आंधाच्या जीवनांचे दर्शन कसे होते हे परिचयाला येते. कथेतील प्रकरणाच्या शेवटी आंध जमातीत रुढ असलेल्या लोककथांचा अभ्यास करणे.

प्रकरण ५ वे

नांदेड जिल्हयातील आंधाचे पारंपरिक लोकनाटय

नांदेड जिल्हयातील आंध जमातीच्या लोकजीवनात फार पूर्वीपासून करमणुकीचे साधन म्हणून अनेक कलाप्रकार रुढ असल्याचे दिसतात. त्यामध्ये दंडार, जागरण, कलापथक व शंकराची कावड या कलाप्रकारांचा समावेश होतो. आजही आंधाच्या लोकधर्मिनाटयातून नृत्य, नाटय, वादन, कथा व अभिनय या कलागुणांचा आविष्कार कशाप्रकारे घडतो. आंधाच्या लोकनाटयांची परंपरा मौखिक असून त्यांची संहिता अलिखित असते. त्याला लिखित स्वरुप देणे आंधाच कथानक पौराणिक असल्याचे दिसते आणि त्यातूनच लोकांचे मनोरंजन कसे होते यावर प्रकाश टाकणे.

आंधाच्या लोकधर्मीनाटयातून नृत्य, नाटय, वादन, कथा व अभिनयासारख्या कलागुणांचा आविष्कार होतो. आंधाच्या लोकनाटयाची परंपरा मौखिक असून त्यांची संहिता अलिखित दिसते. गीते यातील गदयपदय मिश्रीत असून कथानक पौराणिक असते. लोकनाटयाची सुरुवात गणेश पूजनाने होते. कलापथकाच्या माध्यमातून विविध नकला, सोंगे, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, साक्षरता अभियान, शाळा, कुटुंबपध्दती, गण, गवळण, गीते यांचा अभ्यास करावा लागेल.

प्रकरण ६ वे

आदिवासी आंधाच्या लोकसाहित्यातील लोकजीवन

आंधाच्या लोकसाहित्यातील लोकजीवनाचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करणार आहोत. सणउत्सव, आचारविचार, चालीरिती, रुढीप्रथा, नवससायास, लोकसमजुती, लोकश्रध्दा, अंधश्रध्दा, वेशभूषा, केशभूषा, अलंकार या घटकांचा समावेश लोकसाहित्यात होतो. निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आंधाच्या घरादारातून, शेती—शिवारातून, रानावनातून, दऱ्याखोऱ्यातून, जंगल, पहाडातून व काबाडकष्ट करताना त्यांच्या साहित्याचे दर्शन घडते.

आंध समाजाच्या लोकजीवनातील कौटुंबिक, सामाजिक व व्यक्तिगत स्वरुपाचे आचार—विचार पाळण्याकडे या लोकांचा कल अधिक असतो. आंध समाजात परंपरेने चालत असलेल्या रुढी व प्रथा कुटुंबात आणि समाजजीवनात हे लोक पाळताना दिसून येतात. आंध समाजात अज्ञानाचे प्रमाण अधिक असल्यामुळे अंधश्रध्दा पाळण्याकडे या लोकांचा कल अधिक दिसून येतो. साप किंवा विंचू चावल्यास त्याचे विष मंत्रोपचाराने उतरते, द्रुष्ट लागणे, भानामती करणे, दृष्टीस दृढ विश्वास असे प्रकार दिसून येतात. त्यांना आंध समाजाच्या विकासाला कशा मारक ठरतात यावर प्रकाश टाकावा लागेल. तुरतपीर, दावल मलिक, वेताळबुवा, म्हसोबा, कान्होबा, खंडोबा, वाघामाय, चांदयाची आई, मरीमाय, सटवाई, आसरा, या नवसाला पावणाऱ्या आंधाच्या प्रमुख देवता होत. याचा अभ्यास करावा लागणार आहे.

प्रकरण ७ वे

उखाणे, म्हणी व वाकप्रचार

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्हयातील आंध जमातीत मौखिक परंपरेने प्रचलित असलेल्या लोकवाङ्मयाचा अभ्यास करणे. यात म्हणी, उखाणे व वाकप्रचार याचा लोकवाङ्मय प्रवाहावर प्रस्तुत प्रकरणात आढावा घ्यावा लागेल. त्यावरुन आंध समाजात रुढ जोपासलेल्या लोकवाङमयाला कित्येक शतकाची परंपरा असल्याची दिसते. यातील भाषा ही आंधाच्या रोजच्या जीवनातील बोलीभाषा असून, तिच्यातील शब्द व त्यांचे अर्थ यावरुन त्यांच्या उच्चार प्रक्रियेचा अभ्यास करावा लागेल.

नांदेड जिल्हयातील आंध समाजात या म्हणी आचार विचार, नातीगोती, जीवनानुभव, चालीरिती, व्यवसाय, घटना प्रसंग इ. चा समावेश होतो. आंध स्त्री—पुरुष उखाण्याला 'आरसे' असे म्हणतात. याच्यावरही प्रकाश टाकावा लागेल.

अ. आंध स्त्रियांची उखाणे.

१. नाव घेण्याचे उखाणे.

२. खेळातील उखाणे

३. विहीण—विहिणीचे उखाणे.

ब. आंध पुरुषाचे उखाणे.

१. नाव घेण्याचे उखाणे.

२. मनोरंजनात्मक उखाणे.

आंधाच्या लोकसंस्कृतीचे भाषिक संचित व अनुभवांचे सार म्हणून त्यांच्या म्हणी, उखाणे व वाकप्रचारांकडे पहावे लागेल.

प्रकरण ८ वे

उपसंहार/निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्हयातील आंध जमातीच्या लोकसाहित्याचा आढावा घेऊन त्याचे निष्कर्ष मांडण्यात येतील.

९. संशोधन अध्ययनाची सामुग्री

संशोधकाला कोणत्याही विषयात संशोधन करण्यासाठी विविध साधन सामुग्रीची आवश्यक्ता असते. त्यानुसार संशोधकाला सामुग्री उपलब्ध करुन संशोधन कार्य करावे लागते. प्राचीन काळातील वाङमय, लेणी व शिलालेखावरुन आंध जमात ही प्राचीन आहे यावर प्रकाश टाकावा लागेल. तसेच आंधाची भाषा व त्यांच्या बोलीतील शब्द, त्यांची वंशवेल, आंधाच्या आडनावाची वैशिष्टये व आंध ही एक क्षत्रीय जमात कशी आहे हे पाहावे लागेल. शोधप्रबंधासाठी वापरण्यात येणारी साधनसामृग्री खालीलप्रमणे आहे.

१. प्रकाशित पुस्तके

२. नियतकालिके

३. संदर्भ ग्रंथ

४. मासिके

५. आदिवासी साहित्य संग्रालये.

या संशोधन सामुग्रीचा उपयोग करुन संशोधन विषयात अधिक भर पडू शकते. तसेच संशोधन हे व्यवस्थित व उत्कृष्ट होऊ शकते. या सामुग्रीचा उपयोग करुन मी माझा संशोधन विषय पूर्ण करणार आहे.

१०. संशोधनातील समस्या :

नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास करताना मला ग्रंथ, ग्रंथालय, संदर्भग्रंथ यांचा आधार घ्यावा लागणार आहे. विषयाशी पूरक संदर्भ ग्रंथ उपलब्ध करताना व तसेच वाडीवर जाणे, लोकांची मनधरणी करणे,

एकरुप होणे, त्यांच्या सोईने गीते कथा एकणे, पाठपुरावा करणे, या अडचणी येतील हे माझ्या संशोधनातील अडचणी येतील. ग्रंथ मिळवताना, मुलाखती घेताना तसेच प्रश्नावलीतील प्रश्न विचारतांना या माझ्या संशोधनातील समस्या आहेत. तरी मी त्यांना सामोरी जाणार आहे.

११. संशोधनाच्या पध्द्ती :

संशोधन करतांना संशोधनाच्या तीन पध्द्ती आपल्यासमोर असतात. त्या पुढील प्रमाणे आहेत.

१. ग्रंथ व ग्रंथालयाच्या आधारे केलेले संशोधन

२. प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन केलेले संशोधन.

३. मुलाखती, प्रश्नावलीचा आधार घेऊन केलेले संशोधन.

या पध्दतीने संशोधन करण्याचा माझा माणस आहे. प्रत्येक व्यक्ति आपल्या सोयीनुसार संशोधन पध्दतीची निवड करीत असते. मी 'नांदेड जिल्हयातील आदिवासी आंध जमातीच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडल्यामुळे या तीनही पध्दतीचा आधार घेऊन मी माझे संशोधन करणार आहे.

संदर्भ सूची :

१. डॉ. राजेश धनजकर — 'मराठवाड्यातील आंध जमातीचे लोकसाहित्य ' अनुराधा प्रकाशन, नांदेड प्रथम आवृत्ती, सप्टेंबर २०१३ पृ. ६६३

२. तुकाराम भिसे — 'आंध जमातीच्या प्राचीन वांशिक व राजकीय इतिहास, ' निर्मल प्रकाशन पृ. २०६

३. रा. गो. चवरे — आंध जमात साहित्य आणि संस्कृती प्रतिमा प्रकाशन, पुणे २०१६

४. डॉ. एस. जी देवगावकर — 'पाच आदिवासी जमाती' साईनाथ प्रकाशन, नागपूर २०१८

५. डॉ. राजेश धनजकर — 'आंध जमात शोध आणि बोध' अनुराधा प्रकाशन, नांदेड २०१३

६. डॉ. गोविंद गारे — पेनगंगा नदीच्या खोऱ्यातील आंध आदिवासी श्रीविद्या प्रकाशन २५० शनिनवार पेठ, पुणे प्रकाशन काल ४ डिसेंबर २००१

७. डॉ. शरद व्यवहारे — लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप, कैलास पब्लिकेशन्स औरंगपूरा औरंगाबाद प्रथम आवृत्ती जानेवारी १९९९

८. डॉ. विद्या व्यवहारे — लोकसाहित्य लोकसंस्कृती प्रतिमा प्रकाशन १३६२

सदाशिव पेठ औंदूबर अपाट्मेंट नवा विष्णू मंदिर चौक पुणे प्रथमावृती २० जून २००२
९. डॉ. साहेब खंदारे . लोकसाहित्य: शब्द आणि प्रयोग प्रतिमा प्रकाशन १३६२
सदाशिव पेठ औंदूबर अपाट्मेंट नवा विष्णू मंदिर चौक पुणे प्रथमावृती
फेब्रु. २००४

संशोधक

शोभा विठठल सरकुंडे

मराठी विभाग

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजेश धनजकर

मराठी विभाग

श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे

कला वाणिज्य व विज्ञान महाविवद्यालय,

गंगाखेड जि. परभणी